सत्यमेव जयते

कार्पोरेट अफेअर्स मंत्रालय
भारत सरकार

# गुंतवणुकदारांसाठी भांडवल बाजार मार्गदर्शिका

संक्षिप्त स्वरुपात

**संपादक**

**पृथ्वी हल्दिया**

प्राईम डेटा बेस

**अनुवादक : अरविंद शं. परांजपे**

गुंतवणुकदार शिक्षण आणि संरक्षण निधी अंतर्गत
जुलै २०१०



**सलमान खुर्शीद**
राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार)
कार्पोरेट अफेअर्स मंत्रालय
भारत सरकार

‘‘कार्पोरेट अफेअर्स मंत्रालयाने गुंतवणुकदार जागरूकता अभियान हा राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून या आर्थिक वर्षापासून घ्यायचे ठरविले आहे. या कार्यक्रमांतर्गत चालू आर्थिक वर्षात सर्व देशामधून आम्ही अनेक संस्थांची मदत घेऊन ३००० गुंतवणुकदार जागरुकता कार्यक्रम घेण्याचे ठरविले आहे. जुलै २०१० मधे ‘सजग गुंतवणुकदार - कार्पोरेट भारताची संपत्ती’ ह्या संकल्पनेवर ‘भारत गुंतवणुकदार सप्ताह’ आयोजित केला आहे. या निमित्ताने माझे मंत्रालय गुंतवणुकदारांसाठी एक सविस्तर मार्गदर्शिका प्रकाशित करत आहे. गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या सामान्य माणसाला त्याचे हक्क आणि जबाबदाऱ्या यांच्या बरोबरीने वेगवेगळ्या गुंतवणूक प्रकारांमधील जोखीम आणि परतावे यांची माहिती या पुस्तिकेत मिळेल. माझी खात्री आहे की, गुंतवणुकदारांमधे सजगता आणण्यासाठी आणि सामान्य माणसाला देशाच्या कार्पोरेट अर्थव्यवस्थेशी जोडण्यामधे या पुस्तिकेचे प्रकाशन एक महत्वाचे पाऊल ठरेल.’’



**आर. बंद्योपाध्याय**

सचिव

कार्पोरेट अफेअर्स मंत्रालय

भारत सरकार

''गुंतवणुकदार शिक्षण आणि जागरुकता कार्यक्रमांची सार्वजनिक चळवळ करण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर अभियान सुरू केले आहे. याकरता या क्षेत्रातल्या अनेक संस्थांना भागीदार म्हणून घेण्याचे ठरवले आहे. गुंतवणुकदारांना सहजरित्या शिक्षित करण्यासाठी माझ्या मंत्रालयाने वेगवेगळ्या गुंतवणूक प्रकारांमधील हक्क आणि जबाबदाऱ्या समजावून सांगणारी सविस्तर पुस्तिका प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. या पुस्तिकेच्या प्रकाशनाने (सर्वसामान्य जनतेला) कार्पोरेट अर्थव्यवस्थेत अधिकाधिक सहभागी होता येईल. सर्वसमावेशक वृद्धीच्या राष्ट्रीय कार्यक्रमात माझ्या मंत्रालयाचा हा छोटा सहभाग आहे. माझी खात्री आहे की, या विषयातील सुप्रसिद्ध तज्ज्ञ श्री. पृथ्वी हल्दिया यांनी संपादित केलेल्या या पुस्तिकेचा फायदा सध्याचे आणि भावी गुंतवणुकदार यांना होईल.''

## गुंतवणुकदार शिक्षण आणि संरक्षण निधी

गुंतवणुकदारांमधील सजगता वाढविण्यासाठी आणि त्यांचे हितरक्षण करण्यासाठी गुंतवणुकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (IEPF) ची स्थापना १९५६ च्या कंपनी कायद्यानुसार झाली आहे. परिसंवाद आणि प्रसार माध्यमांमधून गुंतवणुकदारांचे प्रशिक्षण करणे आणि त्यांच्यात जागरुकता आणणे आणि या विषयीचे प्रकल्पांना निधी उपलब्ध करणे हे IEPF तर्फे केले जाते. या उद्देशाने आयईपीएफने तीन वेबसाईटसूही प्रायोजित केल्या आहेत.

## आयईपीएफच्या गुंतवणुकदारांविषयीच्या बेबसाईट्स

**iepf.gov.in**

छोट्या गुंतवणुकदारांची भांडवलबाजारासंबंधीच्या सर्व प्रकारच्या विषयांच्या माहितीची गरज भागवणारी आणि त्यांच्या शब्दात माहिती देणारी ही बेवसाईट आहे.

हिंदी, इंग्रजी आणि १२ प्रादेशिक भाषांमधे उपलब्ध असलेली ही वेबसाईट सध्या प्राथमिक भाग विक्री (आयपीओ), म्युच्युअल फंड, शेअर ट्रेडिंग, डिपॉझिटरी, डेट मार्केट, डेरीव्हेटिव्ज, निर्देशांक, इंडेक्स फंड, गुंतवणुकदार तक्रारी, (शेअर बाजार), गुंतवणुकदार हक्क आणि जबाबदाऱ्या, 'हे करा/हे करु नका' इत्यादी विषयांवर माहिती देते.

**watchoutinvestors.com**

फसवणुकीपासून सर्वात चांगला बचाव म्हणजे स्वत: जागरुक असणे. अशा प्रकारची जगातील ही पहिलीच मोफत सार्वजनिक सेवा, गुंतवणुकदारांना फसवणाऱ्या व कायदे न पाळणाऱ्या कंपन्या आणि मध्यस्थांविरूद्ध स्वसंरक्षणाचे साधन पुरवते. देशातील अशा प्रकारच्या सर्व नोंदी असणारी ही वेबसाईट आहे. नवीन गुंतवणूक करण्यापूर्वी आणि अशा घटकांकडे केलेल्या गुंतवणुकीच्या पोर्टफोलिओचे परिक्षण करण्यासाठी गुंतवणुकदारांना या वेबसाईटवर जलद आणि सोप्या पद्धतीने शोध घेऊन माहिती मिळू शकते. ३१ मे २०१० या दिवसापर्यंत फसवणाऱ्या व कायदे न पाळणाऱ्या ७२,५१७ कंपन्या/फर्मस् आणि ३३,९४७ व्यक्ती अशांची नोंद या वेबसाईटवर केली आहे. BSE,

CDSL, CLB, DRT, EPFO, IRDA, MCA, NHB, NSDL, NSE, RBI, ROC, SEBI या नियंत्रक संस्थांनी दिलेल्या आदेशांनुसार ही यादी बनवली आहे. ३१ मे २०१० या दिवसापर्यंत या वेबसाईटचा २७,००,००० गुंतवणुकदारांनी उपयोग केला आहे.

**investorhelpline.in**

मिनिस्ट्री ऑफ कंपनी अफेअर्स, रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया आणि रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्याशी संबंधित तक्रारींचे निवारण एका छत्राखाली करण्यासाठीचे हे मोफत पोर्टल आहे. संबंधित कंपनी आणि नियंत्रक संस्था यांच्याकडून या वेबसाईटवर आलेल्या तक्रारींचे निवारण केले जाते. भांडवलबाजार आणि कंपनी ठेवी यांच्याविषयीच्या तक्रारींची नोंद सहजरित्या करून तक्रार निवारणाच्या प्रगतीचा आढावा गुंतवणुकदारांना घेता येतो. अनेक लोक या वेबसाईटचा फायदा घेत आहेत.

* * *

# संपादकाचे २० मंत्र

**योग्य रीतीने बचत करा...**
**शहाणपणाने गुंतवणूक करा.**

## गुंतवणूक

- गुंतवणूक अनिवार्य आहे.
- तुम्ही गुंतवणूक केली नाही तर तुम्ही बचत केलेल्या रकमेचे मूल्य/ क्रयशक्ती कमी होते.
- परंतु बेदरकारपणे केलेली गुंतवणूक संपत्तीला हानीकारक असते.

### शहाणपणाचे मंत्र

**मंत्र १**

**सशक्त कंपन्यांमधेच गुंतवणूक करा.**

- लहान किंमतीच्या किंवा बाजाराबरोबर भरकटणाऱ्या कंपन्यांचे शेअर घेऊ नका.
- सशक्त कंपन्यांमधेच गुंतवणूक करा कारण दीर्घकाळात त्यांचीच कामगिरी चांगली होते आणि बाजाराचा दबाव त्या सहन करू शकतात.
- कंपनीला/प्रवर्तकांना इक्विटी शेअर्स काही नियमांनुसारच परत विकत घेता येतात.
- सशक्त शेअर्सची खरेदी-विक्री कधीही करता येते.

**मंत्र २**

**काळजीपूर्वक वाचा.**

- तुम्ही कष्टाने मिळवलेला पैसा जुगाराने घालवू नका.
- जागरुकतेने छाननी आवश्यक आहे.
- ऑफर डॉक्युमेंट काळजीपूर्वक वाचा. १००० पानांपेक्षा जास्त असलेले ऑफर डॉक्युमेंट वाचणे हे प्रत्यक्षात अवघड असते. जरी संक्षिप्त प्रॉस्पेक्टस वाचणेही अवघडच असले, तरीसुद्धा, जोखमीच्या बाबी, खटले, प्रवर्तक, कंपनीचा इतिहास, प्रकल्प, विक्रीची उद्दिष्टे आणि आर्थिक माहितीचा गोषवारा हे तरी नक्कीच वाचा.

**मंत्र ३**

**जीवनचक्रानुसार गुंतवणुकीचे धोरण अवलंबा.**

- तरुणपणी तुम्ही अधिक जोखीम घेऊ शकता.
- ५० वर्षानंतर जोखीमयुक्त प्रकारांमधून बाहेर पडा.
- ५५ ते ६० वयानंतर तुम्ही इक्विटीच्या पूर्णपणे बाहेर जा. (पैसे मिळवत नसताना भांडवल घालवणे तुम्हाला परवडणारे नाही.) या वयात टीव्हीवरचा किंमत पट्टा बघण्यापेक्षा आयुष्यात अनेक गोष्टी आहेत.

**मंत्र ४**

**आयपीओमधे गुंतवा.**

- प्रवेश करायला आयपीओ चांगले आहेत. बुल मार्केटमधे बहुतेक सर्वच आयपीओ नोंदणीच्या दिवशी थोडा जास्त किंवा भरपूरच परतावा देतात. जर गुंतवणुकदाराने फायदा कमवला नाही तर तो लोभी आहे किंवा त्याचा कंपनी/उद्योग/बाजार यावरील होरा चुकला असे समजावे.त्याने आयपीओच्या किंमतीबद्दल तक्रार करू नये.

  हे लक्षात ठेवा,
- आयपीओ ही विकत घ्यायची गोष्ट असून ती गुंतवणुकदारावर लादलेली नाही.
- आयपीओपासून अपेक्षा ठेवू नका.
- तुमची गुंतवणूक आयपीओमधे आहे का कंपनीमधे आहे हे ठरवा. आयपीओमधे असेल तर नोंदणीच्या दिवशी बाहेर पडा. जर कंपनीमधे असेल तर इतर कंपन्यांप्रमाणे गुंतवणूक चालू ठेवा. काही जरी असले तरी QIB कडून भरणा जास्त झाला असेल तर तुम्ही गुंतवणूक करा.
- गुंतवणुकीसाठी ASBA चा उपयोग करा.

**मंत्र ५**

**सरकारी उपक्रमाच्या आयपीओमधे जरुर गुंतवणूक करा.**

- फक्त चांगल्या आणि फायदेशीर सरकारी कंपन्यांचेच आयपीओ येतात. फसवणुकीचा धोका नाही.
- वैयक्तिक गुंतवणुकदारांसाठी सवलत असते.
- नोंदणीची किंमत काहीही आली तरी त्रास करून घेऊ नये. गुंतवणूक कायम ठेवावी.

**मंत्र ६**

**म्युच्युअल फंडात गुंतवणूक करा पण योग्य फंड आणि योजना निवडा.**

- भारतामधे म्युच्युअल फंडांमधे कंपन्यांच्या पैशाचे वर्चस्व आहे. लहान गुंतवणुकदारांवरती कमी लक्ष आहे.
- तरीसुद्धा लहान गुंतवणुकदारांना म्युच्युअल फंड हे अधिक चांगले साधन आहे.
- अनेक म्युच्युअल फंड्स आणि त्यांच्या अनेक योजना आहेत. योग्य योजनेची निवड करा.

**मंत्र ७**

**विक्री करायला शिका.**

- बहुतेक गुंतवणुकदार खरेदी करतात आणि कायम ठेवतात. (प्रसार माध्यमातून तज्ज्ञांचा सल्लाही बहुतेक वेळा 'खरेदी करणे/कायम ठेवणे' असा असतो. क्वचितच विक्रीचा असतो.)
- फायदा तुमच्या बँक खात्यात आल्यानंतरच तुमचा खरा फायदा होतो. (वहीत किंवा एक्सेलशीटमधे असताना नाही.)
- लक्षात ठेवा की, तुम्हाला कमाल फायदा कधीही मिळणार नाही त्यामुळे लोभ ठेऊ नका.
- फायद्याचे लक्ष्य ठेवा व विक्री करा.

**मंत्र ८**

**अधिकृत मध्यस्थांबरोबरच व्यवहार करा.**

- बाजारामधे अनेक अनधिकृत दलाल असतात जे तुम्हाला उच्च परताव्याचे आमिष दाखवून तुमचा पैसा गायब करतात.
- नोंदणी केलेल्या मध्यस्थांबरोबर व्यवहार करणे सुरक्षित आहे ज्यामुळे नियंत्रकांच्या कृतीचा तुम्हाला फायदा मिळतो.

**मंत्र ९**

**लोभाला बळी पडू नका.**

- तुमच्या लोभाचा फायदा घ्यायला अनेक फसवे लोक आजुबाजूला असतात.
- बहुतेक घोटाळ्यांमधे लहान गुंतवणुकदारांचे नुकसान होते.
- तुमचे पैसे मागणाऱ्या प्रत्येकापासून सावध रहा.

**मंत्र १०**

**माध्यमांपासून सावध रहा. (विशेषत: शेअरविषयी सल्ला देणाऱ्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांपासून)**

- भांडवलबाजारात फुकट सल्ला देणारे अनेक संत (?) आहेत.
- प्रत्यक्षात या सल्लागारांचा अंत:स्थ हेतू वेगळा असतो.
- श्रीमंत करु असे सांगणाऱ्या ई-मेल आणि एसएमएस यांच्यापासून सावध रहा.

**मंत्र ११**

**जाहिरातींना भुलू नका.**

- जाहिरातीचा उद्देश तुम्हाला सुखावणे हा असतो.
- आकर्षक शीर्षके, मनोहारी दृश्ये आणि पकड घेणारे संदेश यांना भुलून जाऊ नका.

**मंत्र १२**

**निश्चित/खात्रीशीर परतावा देणाऱ्या योजनांपासून सावध रहा.**

- बँकेच्या कर्जदरापेक्षा जास्त परतावा देणारी व्यक्ती संशयास्पद समजा.
- लक्षात ठेवा, वृक्ष लागवड करणाऱ्या कंपन्यांनी उच्च परतावा देण्याचे आश्वासन दिले होते (काहींनी पहिल्या दिवशीच ५० % !)

**मंत्र १३**

**ग्रे मार्केटमधल्या वाढाव्या(प्रियियम)पासून सावध रहा.**

- हे कृत्रिम असून साधारणपणे प्रवर्तकांनीच घडवून आणलेले असते.

**मंत्र १४**

**कुठल्यातरी क्षेत्राच्या उठवलेल्या हवेमुळे हुरळू नका.**

- सध्याची हवा पायाभूत सुधारणा आणि लॉजिस्टिक्स या क्षेत्राविषयी आहे.
- एका क्षेत्रातल्या सर्वच कंपन्या चांगल्या नसतात. प्रत्येक क्षेत्रात काही उत्तम कंपन्या, काही मध्यम तर काही वाईट कंपन्या असतात.
- चालू हवेचा फायदा करण्यासाठी नाव बदलणाऱ्या कंपन्यांपासून सावध रहा.

**मंत्र १५**

**सुखदायी घटकांवर जास्त अवलंबून राहू नका.**

- आयपीओचे पतनामांकन (ग्रेडींग)
- स्वतंत्र संचालक.

**मंत्र १६**

**अकाऊंट्स केवळ ऑडिटेड आहेत म्हणून त्यावर अंधविश्वास ठेवून निर्णय घेऊ नका.**

- घोटाळा केलेले अकाऊंट्स आणि आर्थिक परिणामांच्या दिशाभूल जाहिरातींची अनेक उदाहरणे आहेत. उदा. सत्यम्
- अकाऊंट्सच्या नोट्स आणि क्वालिफिकेशन्स जरूर वाचा.
- संबंधित व्यक्ती, ऋणको (डेटर्स) आणि दुय्यम कंपन्या यांच्यातील असाधारण आकडेवारीकडे विशेष लक्ष द्यावे.

**मंत्र १७**

**स्वस्त शेअर्स खरेदीयोग्य असतातच असे नाही.**

- किंमतीच्या मागे धावू नका. मूल्यामागे धावा.
- कंपनीची कामगिरी खराब असल्यामुळे किंमत कमी असू शकते. (परंतु कंपनी/क्षेत्र यांची हवा झाल्यामुळे तुम्हाला त्याचे आकर्षण वाटू शकते.)
- त्याहीपेक्षा शेअर्सचे विभाजन झाल्यामुळे सुद्धा किंमत कमी असू शकते. (५०० पेक्षा अधिक कंपन्यांनी शेअर्सचे विभाजन केले आहे.)
    - दिलेले कारण: लहान गुंतवणुकदारांना शेअर्स घेता यावे म्हणून.
    - हे खरे नाही कारण डिमॅटमधे तुम्ही एक शेअर सुद्धा घेऊ शकता.
    - खरा हेतु शेअर 'स्वस्त' आहे असे दाखवणे.
    - रु. ५० किंमत असलेल्या शेअरचे १:१० असे विभाजन झाले आहे.

**मंत्र १८**

**जे प्रवर्तक स्वत:लाच शेअर्स/वॉरन्ट्स जारी करतात त्या कंपन्यांपासून सावध रहा.**

- प्रवर्तकांना प्राधान्याने जारी केलेले शेअर्स हे त्यांच्या फायद्यासाठीच असतात. (ह्क्कभाग विक्री हा जास्त योग्य मार्ग आहे.)

**मंत्र १९**

**कार्पोरेट व्यवस्थापन/कार्पोरेट सामाजिक जबाबदारी संबंधीच्या पारितोषकांना भुलू नका.**

- कार्पोरेट व्यवस्थापन/कार्पोरेट सामाजिक जबाबदारी पार पाडण्याच्या कामांवर भर देणाऱ्या कंपन्यामधे घोटाळेबाज कंपन्यांचे प्रमाण खूप आहे.

**मंत्र २०**

**प्रामणिक रहा.**

- स्वत:शी प्रामाणिक रहा तरच तुम्हाला इतरांकडून प्रामाणिकपणाची अपेक्षा करता येईल.
- आपण अतिशय लेचेपेचे गुंतवणुकदार आहोत/सशक्त संघटना नाही/ त्यामुळे आपण प्रत्येक गोष्ट निमूटपणे सहन करतो.
- गुंतवणुकदारांच्या सशक्त संघटना सुरु करुन/सामील होऊन आपल्या हक्कांसाठी भांडणे जरुरीचे आहे.
- नुकसानभरपाईची मागणी करणे जरुरीचे आहे.

# गुंतवणुकदाराचे हक्क

## भांडवल बाजार

भांडवल बाजार हा इक्विटी आणि डेट यांचा बाजार आहे ज्यामधे कंपन्या आणि सरकार दीर्घकाळासाठी निधीची उभारणी करतात. दुय्यम बाजारात (सेकंडरी मार्केट) या सिक्युरिटीजचा व्यापार करता येतो. सेबी आणि रिझर्व बँक ऑफ इंडियासारखे नियंत्रक, भांडवल बाजाराचे नियंत्रण करतात आणि त्यांचा योग्य तऱ्हेने विकास होईल अशी पावले उचलून गुंतवणुकदारांचे संरक्षण करतात.

कंपनीचे खरे मालक भागधारक असतात. कंपनीची कामगिरी चांगली झाली तर लाभांश आणि भांडवलवृद्धीने त्यांचा फायदा होतो. त्याचबरोबर कंपनीची कामगिरी खराब झाली तर त्यांच्या गुंतवणुकीतील काही/संपूर्ण भागाचे नुकसान सोसण्याची जोखीम त्यांना पत्करावी लागते.

## भागधारकाचे अधिकार

- समभाग जारी केल्यानंतर किंवा खरेदी केल्यानंतर ठराविक वेळेत मिळणे.
- ताळेबंद, नफातोटा पत्रक, सनदी लेखापालाच्या अहवालाचा समावेश असलेला कंपनीचा वार्षिक अहवाल मिळणे.
- ठरलेल्या वेळेत लाभांश मिळणे.
- हक्क भाग, बक्षिसभाग असे कार्पोरेट फायदे मिळणे.
- कंपनीचे हस्तांतरण, डीलिस्टिंग किंवा बाय बॅक यांची सूचना मिळणे.
- सर्वसाधारण सभेत भाग घेणे/मतदान करणे.
- कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ठेवलेल्या वैधानिक नोंदवहींचे परिक्षण करणे.
- सर्वसाधारण सभेच्या कामकाज नोंदवह्यांचे परिक्षण करणे आणि प्रती घेणे.
- घोटाळेबाज आणि गुंतवणुकदारांवर अन्याय करणाऱ्या कंपन्यांविरूद्ध तक्रार करणे आणि अन्यायाविरूद्ध दाद मागणे.
- कुचराई करणाऱ्या कंपनीविरूद्ध दिवाणी अथवा फौजदारी कारवाई करणे.
- कंपनी गुंडाळली गेल्यानंतर त्यातील उर्वरित रक्कम मिळणे.

**रोखेधारकाचे अधिकार**

- व्याज/रक्कम ठरलेल्या वेळेत मिळणे.
- विनंती केल्यानंतर ट्रस्टडीडची प्रत मिळणे.
- मुदत संपल्यावर रोख्याचे पैसे न मिळाल्यास कंपनी लॉ बोर्डाकडे तक्रार करणे.
- कंपनीने कर्ज परत न केल्यास ती गुंडाळण्याचा अर्ज करणे.
- तक्रार निवारणासाठी डिबेंचर ट्रस्टीकडे धाव घेणे.

**सिक्युरिटी खरेदी आणि विक्री करणाऱ्यांचे अधिकार**

- उत्तम किंमत
- किंमत/दलालीचा पुरावा मिळणे.
- शेअर्स वेळेत मिळणे.
- दलाल, डिपॉझिटरी इत्यादींकडून अकाऊंट स्टेटमेंट मिळणे.

**सिक्युरिटी खरेदी आणि विक्री करणाऱ्यांची कर्तव्ये**

- दलाल आणि डिपॉझिटरी यांच्याबरोबर करार करणे.
- योग्य कॉन्ट्रॅक्ट नोट असणे.
- वेळेत रक्कम/शेअर्स अदा करणे.

**याविरूद्ध तक्रार निवारणाचे अधिकार**

- फसव्या किंमती
- अयोग्य दलाली
- रक्कम/शेअर्स मिळण्यातला विलंब

**गुंतवणुदार म्हणून तुमची जबाबदारी**

- माहिती करून घेणे
- सजग असणे.
- वैयक्तिकरित्या किंवा सामुहिकरित्या तुमचे अधिकार बजावणे.

# करा आणि करू नका

## प्राथमिक बाजार (प्रायमरी मार्केट)

### करा

- प्रॉस्पेक्टस/संक्षिप्त प्रॉस्पेक्टस काळजीपूर्वक आणि विशेषत : या गोष्टींसाठी वाचा.
  - जोखमीच्या बाबी
  - प्रवर्तकांची पार्श्वभूमी
  - कंपनीचा इतिहास
  - प्रलंबित खटले आणि डिफॉल्ट
  - आर्थिक निष्कर्ष
  - विक्रीची उद्दिष्टे
  - विक्री किंमतीचे स्पष्टीकरण
  - अर्ज भरण्याच्या सूचना
- शंका किंवा प्रश्न असल्यास ऑफर डॉक्युमेंटमधे उल्लेख केलेल्या अंमलबजावणी (कंप्लायन्स ऑफिसर) अधिकाऱ्याकडे चौकशी करावी.
- ठरलेल्या वेळेत जर तुम्हाला तुमच्या डीमॅटमधे समभाग मिळाले नाहीत किंवा भरलेली रक्कम परत मिळाली नाही तर अंमलबजावणी (कंप्लायन्स ऑफिसर) अधिकाऱ्याकडे आणि इश्यूनंतरच्या लीड मॅनेजर्सकडे तक्रार करावी.

### करू नका

- शेअर जारीकर्त्याने किंवा इतर कोणीही दिलेल्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वचनांना भुलू नका.
- केवळ, चालू असलेल्या बुल मार्केटला/त्याच उद्योगात असलेल्या इतर कंपन्यांच्या शेअरच्या भावांना किंवा त्या कंपनीच्या समुहातील इतर कंपन्यांच्या शेअर्सच्या भावांना भुलून गुंतवणूक करू नका.
- नोंद झाल्यानंतर लगेचच किंवा कायमच कंपनीच्या शेअरचे भाव वर जातील अशी अपेक्षा ठेवू नका.

## दुय्यम बाजार (सेकंडरी मार्केट)

**करा**

- गुंतवणूक करण्यापूर्वी कंपनीची कारकीर्द, व्यवस्थापन, मूलभूत बाबी, त्यांनी नुकत्याच केलेल्या घोषणा आणि त्यांनी उघड केलेली इतर माहिती हे सर्व तपासून बघा. शेअर बाजार आणि कंपनीच्या वेबसाईट्स, माहिती पुरवणाऱ्या संस्था, आर्थिक वृत्तपत्रे, मासिके यांमधे ही माहिती असते.
- सर्व गुंतवणुकींमधे जोखीम असल्यामुळे तुमच्या जोखीम क्षमतेनुसार गुंतवणूक/व्यापार धोरण ठरवा.
- गुंतवणुकीचा निर्णय घेण्यापूर्वी गुंतवणुकीचा जोखीमसापेक्ष परतावा, त्याची तरता (लिक्विडिटी) आणि सुरक्षितता यांचा विचार करा.
- सेबीची मान्यता असलेले शेअर बाजार, दलाल आणि उपदलाल यांच्या मार्फतच व्यवहार करा.
- क्लायंट रजिस्ट्रेशन, क्लायंट -ट्रेड मेंबर ॲग्रीमेंट इ. नीट वाचा आणि दलालाकडे खाते उघडताना आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता करा.
- नो युवर क्लायंट (केवायसी) कागदपत्रावर सही करा.
- तुमचे दलाल/उपदलाल/डिपाझिटरी पार्टिसिपंट (डीपी) यांना स्पष्ट आणि नि:संदिग्ध सूचना द्या.
- प्रत्येक व्यवहार झाल्यानंतर कॉन्ट्रॅक्ट नोट घेण्यावर भर द्या आणि त्यातील तपशील तपासून बघा. शंका आल्यास शेअर बाजाराच्या वेबसाईटवरील व्यवहारांशी ताडून बघा.
- आगाऊ रक्कम (मार्जिन मनी) ठरलेल्या वेळेत भरत रहा.
- विक्री केल्यानंतर ठरलेल्या वेळेत शेअर्स/डिपॉझिटरी स्लीप द्या आणि खरेदी केल्यानंतर ठरलेल्या वेळेत रक्कम द्या.
- दलाली/रक्कम/मार्जिन इ. अधिकृत व्यक्तींनाच द्या.
- मार्जिनसाठी दिलेल्या कोलॅटरलची पावती घ्या.
- डीपीकडून मिळालेले ट्रान्झॅक्शन आणि होल्डिंग स्टेटमेंट तपासून पहा.
- डीपीकडून मिळालेले डिलीव्हरी इन्स्ट्रक्शन स्लीप बुक (डीआयएस) व्यवस्थित ठेवा. डीआयएसचे क्रमांक आणि तुमचा क्लायंट आयडी

त्यावर छापलेला असला पाहिजे.

- तुम्ही जर वारंवार व्यवहार करत नसाल तर डीमॅट अकाऊंटच्या फ्रिजिंग फॅसिलिटीचा फायदा घ्या.
- गुंतवणुकीच्या सर्व प्रकारच्या कागदपत्रांची प्रत ठेवा आणि व्यवहार करण्यापूर्वी योग्य ते प्रश्न विचारून तुमच्या शंकांचे निरसन करा.

**करु नका**

- गुंतवणुकीत असलेल्या संभाव्य धोक्यांची नोंद घ्यायला विसरू नका.
- ऑफ-मार्केट व्यवहार करू नका.
- अनधिकृत मध्यस्थांबरोबर व्यवहार करू नका.
- अवास्तव किंवा खात्रीशीर परताव्यांच्या वचनांना बळी पडू नका.
- अफवा, टीप्स आणि ऐकिव बातम्या यांच्यावर अवलंबून गुंतवणूक करू नका.
- एखाद्या कंपनीच्या शेअर्सच्या व्यवहारातील अचानक झालेली वाढ/ वाढलेली किंमत/ माध्यमातून त्याविषयी आलेली माहिती यावर अवलंबून मूलभूतरित्या कमकुवत असलेल्या कंपनीचे शेअर्स (पेनी स्टॉक) खरेदी करू नका.
- कळपाच्या मागे आणि वेगाने वाढणाऱ्या शेअर्सच्या मागे जाऊ नका.
- टीव्ही चॅनल्स/वेबसाईट/एसएमएस याद्वारे मिळालेला गुंतवणुकीविषयी सल्ला आंधळेपणाने पाळू नका.
- मित्रांच्या दडपणाने गुंतवणूक करू नका किंवा इतरांना फायदा झाला म्हणून त्यांच्या गुंतवणुकीच्या निर्णयांची नक्कल करू नका.
- बाजाराची नेमकी वेळ गाठायचा प्रयत्न करू नका.
- सरकारी मान्यता/परवाने मिळालेल्या कंपन्यांना भुलू नका कारण अशी मान्यता इतर कारणांसाठी असू शकते.
- कंपनीच्या आर्थिक प्रगतीच्या जाहिरातींना भुलू नका.
- प्रसार माध्यमांमधून आलेल्या कंपनीच्या कार्पोरेट प्रगतीच्या बातम्यांना भुलू नका कारण त्यातील काही चुकीच्या असू शकतात.
- तुमच्या गुंतवणुकीची व्याजासह परतफेड पुढच्या तारखेच्या चेकद्वारे

करणाऱ्या कंपनीच्या हमीला भुलू नका.

- तुमच्या शंका आणि तक्रारीचे निरसन करण्यासाठी योग्य अधिकाऱ्याकडे जायला संकोच करू नका.
- तुमच्या डीमॅट खात्याची सही केलेली कोरी डिलीव्हरी इन्स्ट्रक्शन स्लीप उघड्यावर टाकू नका.
- सही केलेली कोरी डिलीव्हरी इन्स्ट्रक्शन स्लीप, डीपी किंवा दलालाला देऊ नका.

## दलाल आणि उपदलालांबरोबरचे व्यवहार

### करा

- फक्त सेबीकडे नोंद असलेल्या उपदलालांकडेच व्यवहार करा आणि त्यांच्याकडे सेबीचे नोंदणी प्रमाणपत्र असल्याची खात्री करा.
- तुमच्याकडून कोण ऑर्डर देणार याची स्पष्ट आणि नि:संदिग्ध सूचना दलालांना द्या.
- क्लायंट रजिस्ट्रेशन फॉर्मवर दलालाची सही घेऊनच व्यवहार सुरु करा.
- तुमच्या दलाल/उपदलालाबरोबर सर्व अटी आणि शर्ती स्पष्ट करून करार करा.
- तुम्ही सही करण्यापूर्वी करारपत्र आणि रिस्क डिस्क्लोजर डॉक्युमेट काळजीपूर्वक वाचा.
- करारपत्राच्या सर्व पानांवर तुम्ही सही करा आणि दलालही तिथे सह्या करतो आहे याची खात्री करा. तसेच साक्षीदारानेही त्याचे नाव आणि पत्ता देऊन करारपत्रावर सह्या करायच्या आहेत.
- व्यवहार झाल्यापासून २४ तासाच्या आत कॉन्ट्रॅक्ट नोट/कन्फर्मेशन मेमोचा आग्रह धरा.
- मूळ बिल/कॉन्ट्रॅक्ट नोट हातात आल्यावरच दुसऱ्या प्रतीवर सही करा.
- प्रत्येक सेटलमेंटनंतर बील मागा.
- कॉन्ट्रॅक्ट नोटवर दलालाचे नाव, व्यवहाराची वेळ, क्रमांक, किंमत आणि दलाली हे दाखवले आहे याची खात्री करा.
- स्टेटमेंट ऑफ अकाऊंटची मागणी करा.

- दलालाच्या फर्मच्या नावानेच ड्राफ्ट द्या.
- पेआऊट झाल्यानंतर २४ तासाच्या आत तुमची रक्कम/डिलीव्हरी मिळते आहे याची खात्री करा.
- तंटा झाल्यास मध्यस्थ/शेअर बाजार/सेबीकडे योग्य वेळेत तक्रार करा.
- उपदलालाशी तंटा झाल्यास त्याची माहिती मुख्य दलालाला लगेच द्या.
- शेअर बाजार/सेबी यांनी केलेल्या नियमावली आणि काढलेली परिपत्रके यांचा परिचय करून घ्या.
- तुमच्या डीमॅट खात्यातील पोर्ट फोलिओचा नियमितपणे आढावा घ्या.
- खरेदी करण्यापूर्वी तुमच्याकडे पैसे असल्याची खात्री करा.
- विक्री करण्यापूर्वी तुमच्याकडे शेअर्स असल्याची खात्री करा.

**करु नका**

- नोंदणी नसलेल्या दलाल/उपदलाल/मध्यस्थांबरोबर व्यवहार करू नका.
- सर्व अटी आणि शर्ती समजल्याशिवाय कोणत्याही मध्यस्थाबरोबर कोणतेही करारपत्र करू नका.
- तुमचे डीमॅट ट्रान्झॅक्शन स्लीप बुक दलाल/उपदलालांकडे देऊ नका.
- तुमचा दलाल/उपदलाल कितीही ओळखीचा असला तरीही सर्व व्यवहारांची कागदपत्रे त्याच्याकडून घ्यायला विसरू नका.

# म्युच्युअल फंड्स

**करा**

- गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेंट वाचा.
- म्युच्युअल फंडातील गुंतवणूक जोखमीची असू शकते आणि त्यातून फायदा होईलच असे नाही याची नोंद घ्या.
- तुमची गुंतवणूक उद्दिष्टे आणि जोखीम क्षमता यावर अवलंबून योजनेत गुंतवणूक करा.
- एखाद्या योजनेच्या/फंडाच्या मागील कामगिरीप्रमाणे त्या योजनेची/फंडाची भविष्यकालीन कामगिरी असेलच असे नाही ह्याची नोंद घ्या. भूतकाळातील कामगिरी परत होईलच असे नाही.
- तुम्ही गुंतवणूक केलेल्या योजनांच्या एनएव्हीचा नियमित आढावा घ्या.
- तुमच्या गुंतवणुकीचे/विक्रीचे अकाऊंट स्टेटमेंट जरूर घ्या.

**करु नका**

- कोणीतरी तुम्हाला कमिशन किंवा भेटवस्तू देत आहे म्हणून त्या योजनेत गुंतवणूक करू नका.
- म्युच्युअल फंडाच्या किंवा त्या योजनेच्या नावाला भुलू नका.
- फंडाच्या किंवा योजनेच्या केवळ मागील कामगिरीला मार्गदर्शक ठरवू नका किंवा भविष्यकालीन परताव्याच्या वचनांची दखल घेऊ नका.
- गुंतवणुकीतल्या जोखमीची नोंद घ्यायला विसरू नका.
- तुमच्या शंका आणि तक्रारीचे निरसन करण्यासाठी योग्य अधिकाऱ्याकडे जायला संकोच करू नका.
- ॲम्फीची मान्यता नसलेल्या प्रतिनिधी/दलालांबरोबर व्यवहार करू नका.

# बायबॅक (शेअर पुनखरेदी)

**करा**

- बायबॅक विषयीचा विशेष ठराव तपशीलवार वाचून त्यावर मतदान करा.
- गेल्या काही महिन्यातील बाजारातील किंमत आणि बायबॅकची किंमत यांची तुलना करा. त्याशिवाय इपीएस, बुक व्हॅल्यू इत्यादी घटकांचाही विचार करून बायबॅक किंमत योग्य आहे की नाही हे ठरवा.
- शेअर्स द्यायचा अर्ज कसा करायचा याच्या सूचना तपशीलवार वाचा.
- लेटर ऑफ ऑफरमधे सांगितलेल्याप्रमाणे पोस्ट/कुरिअर याद्वारे जाहीर केलेल्या वेळेत तुमचा अर्ज कलेक्शन सेंटरमधे पोचतो आहे याची काळजी घ्या.
- लेटर ऑफ ऑफरमधे सांगितलेली सर्व कागदपत्रे अर्जाबरोबर जोडा.
- तुम्ही दिलेल्या शेअर्सच्या रकमेच्या संदर्भात कंपनीकडून प्रतिसाद न मिळाल्यास मर्चंट बँकरशी संपर्क साधा.
- कोणत्याही तक्रारीसाठी लेटर ऑफ ऑफर मधे उल्लेख केलेल्या अंमलबजावणी अधिकाऱ्याशी संपर्क साधा.
- कंपनी कायद्याचे उल्लंघन झाले आहे असे वाटल्यास रजिस्ट्रार ऑफ कंपनीशी संपर्क साधावा.

**करू नका**

- एका पेक्षा जास्त अर्ज करू नका.
- अर्ज सुवाच्य अक्षरात आणि व्यवस्थितपणे भरायला विसरू नका.
- फाटलेले अर्ज देऊ नका.
- चुकीच्या पत्त्यावर अर्ज पाठवू नका.
- तारीख उलटल्यानंतर अर्ज पाठवू नका.
- अर्जामध्ये पूर्ण माहिती भरायला विसरू नका.
- अर्जावर सही करायला विसरू नका.
- अर्जामधे चुकीची/विरोधाभास असलेली माहिती देऊ नका.

## ओपन ऑफर्स (सेबी टेकओव्हर नियमावलीनुसार)

**करा**

- ऑफरचा स्वीकार करण्यापूर्वी अन्य स्पर्धात्मक ऑफर्सची किंवा सुधारित ऑफर्सची नोंद घ्या.
- स्पर्धात्मक ऑफर्सच्या किंवा सुधारित ऑफर्सच्या माहितीसाठी सेबीची वेबसाईट बघा आणि राष्ट्रीय वृत्तपत्रे वाचा.
- लेटर ऑफ ऑफरमधे उल्लेख असलेल्या वैधानिक अनुमतींवर ऑफर अवलंबून असते याची नोंद घ्या.
- ऑफरमुळे कंपनी डीलीस्ट होते का याची दखल घ्या.
- डिमॅट खात्याच्या बाबतीत ऑफर बंद होण्यापूर्वी स्पेशल डिपॉझिटरी अकाऊंटमधे शेअर्स जमा आहेत याची खात्री करा.
- लेटर ऑफ ऑफरमधे सांगितलेल्याप्रमाणे कागदपत्रे पोचण्याच्या वेळेची काळजीपूर्वक नोंद घ्या.
- ऑफर सुधारण्याच्या शेवटच्या दिवसानंतरच (ऑफर बंद होण्याच्या पूर्वी ७ दिवस) तुमची स्वीकृती पाठवा.
- जर तुम्ही देऊ केलेले शेअर्स तुम्हाला परत घ्यायचे असतील तर ऑफर बंद व्हायच्या आधी ३ दिवस विड्रॉवल फॉर्म तुमच्या पत्रासह कलेक्शन सेंटरमधे द्यावा.
- ॲक्सेप्टन्स फॉर्म, ट्रान्सफर डीड, डिपॉझिटरी इन्स्ट्रक्शन आणि विड्रॉवल फॉर्म यावरील सह्या कंपनीत नोंद केलेल्या सह्यांप्रमाणेच आणि त्याच क्रमाने आहेत याची खात्री करा.
- ऑफर डॉक्युमेंट तुम्हाला मिळाले नसेल तर साध्या कागदावर अर्ज करून तुम्ही शेअर्स देऊ शकता किंवा ऑफरमधून बाहेर पडू शकता.

**करू नका**

- तुमची स्वीकृती कळवायला ऑफर बंद होण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत थांबू नका.
- ट्रान्स्फर डीडवर खरेदीदार आणि विक्रेता यांची नावे भरू नका.
- अपूर्ण अर्ज किंवा अयोग्य कागदपत्रे दाखल करू नका.

# सामुहिक गुंतवणूक योजना (कलेक्टीव्ह इन्व्हेस्टमेंट स्कीम)

**करा**

- कलेक्टीव्ह इन्व्हेस्टमेंट स्कीमची सेबीकडे नोंद झाली आहे याची खात्री करा.
- ऑफर डॉक्युमेंट काळजीपूर्वक वाचा.
- योजनेचा ॲप्रायझल रिपोर्ट वाचा.
- प्रकल्पाची फायदेशीरता तपासा.
- प्रवर्तकांची पार्श्वभूमी आणि योग्यता तपासा.
- योजना अंमलात आणण्यासाठी कलेक्टीव्ह इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट कंपनीकडे (सीआयएमसी)पुरेशी साधने आहेत याची खात्री करा.
- सीआयएमसीचे मालमत्तेवरचे हक्क निर्वेध आणि विक्रीयोग्य आहेत याची खात्री करा.
- योजनेचा कालावधी आणि त्याचे पतमानांकन तपासा.
- आधीच्या योजनांचे 'वचन' आणि 'अंमलबजावणी' तपासा.
- वर्ष संपल्यापासून २ महिन्यापर्यंत सीआयएमसी अहवाल पाठवते आहे याची खात्री करा.
- लक्षात ठेवा की, गुंतवणुकदारांना परतावा देण्याची हमी सेबी घेत नाही तसेच त्यांचे पैसे परत करण्याची जबाबदारी घेत नाही.

**करू नका**

- सेबीकडे नोंद नसलेल्या कलेक्टीव्ह इन्व्हेस्टमेंट स्कीममधे गुंतवणूक करू नका.
- सूचित केलेल्या किंवा हमी दिलेल्या परताव्याच्या वचनांना किंवा बाजार गप्पांना/जाहिरातींना भुलू  नका.

# डेरीव्हेटीव्हज

**करा**

- शेअर बाजाराने केलेले सर्व नियम, पोटनियम आणि केलेले प्रकटीकरण काळजीपूर्वक वाचा.
- सेबीकडे नोंद असलेल्या ट्रेडिंग मेंबरकडून किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीकडूनच व्यवहार करा.
- प्रतिनिधीकडे व्यवहार करताना कॉन्ट्रॅक्ट नोट मुख्य ट्रेडिंग मेंबरकडूनच मिळते आहे याची खात्री करा.
- दलाली, मार्जिन आणि इतर रक्कम हे ट्रेडिंग मेंबरलाच द्या.
- प्रत्येक व्यवहाराची कॉन्ट्रॅक्ट नोट ट्रेडिंग मेंबरकडून मिळते आहे याची खात्री करा.
- मार्जिनसाठी दिलेल्या कोलॅटरलची पावती ट्रेडिंग मेंबरकडून घ्या.
- क्लायंट - ट्रेडिंग मेंबर करारनामा नीट वाचा.
- मार्जिन कॉल्समधील आणि बाजारातील तुमच्या पोझिशनमधील जोखमीची जाणीव असू द्या.
- फ्युचर पोझिशन्सवरील 'मार्क टू मार्केट' मार्जिन्स रोजच्या रोज ट्रेडिंग मेंबरकडे भरा/ट्रेडिंग मेंबरकडून घ्या.

**करु नका**

- जोखीम किती आहे हे समजल्याशिवाय आणि कागदपत्रे वाचल्याशिवाय कुठल्याही प्रकारामधे व्यवहार चालू करू नका.

# खरेदीची प्रक्रिया

**उत्पादने कोठून खरेदी करावीत ?**

- दलाल: शेअर्सची खरेदी/विक्री, रोखे, डेरीव्हेटीव्हज उत्पादने, म्युच्युअल फंड युनिट्स, आयपीओ यासंबंधीची सेवा दलाल पुरवतात.
- बँक: शेअर्सची खरेदी/विक्री, रोखे, डेरीव्हेटीव्हज उत्पादने, म्युच्युअल फंड युनिट्स, आयपीओ यासंबंधीची सेवा अनेक बँका प्रत्यक्ष किंवा त्यांच्या वेबसाईटवरून पुरवतात.
- म्युच्युअल फंड्स : बहुतेक सर्व म्युच्युअल फंड्स, म्युच्युअल फंड्स खरेदी-विक्रीच्या सेवा प्रत्यक्षात किंवा बेवसाईटद्वारा देतात.
- शेअर बाजार: म्युच्युअल फंडाच्या क्लोज एंडेड योजना शेअर बाजारावर नोंदलेल्या असतात, ज्यांची खरेदी दलालांकडून करता येते. म्युच्युअल फंडांच्या खुल्या योजनांची खरेदी-विक्री शेअर बाजारातूनही होते.

**भांडवल बाजारातील गुंतवणूकदार होण्याच्या पायऱ्या**

- पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.
- दुसरी गरज म्हणजे बँक आणि डीमॅट अकाऊंट. ही दोन्ही संलग्न असल्यास शेअर्स आणि पैसे जमा करायला सोपे जाते.
- पुढची पायरी म्हणजे दलालाची निवड करून केवायसी फॉर्म भरणे आणि ब्रोकर-क्लायंट करारपत्र करणे.
- त्यानंतर दलाल एक क्लायंट आयडी देतो की ज्याचा उपयोग आयडेंटीफिकेशनसाठी होतो.
- आता तुम्ही शेअर्स खरेदी-विक्री करण्यास सज्ज आहात.

# कोण कोणाचे नियंत्रण करतो ?

| **संस्था** | **नियंत्रक** |
|---|---|
| ऑडिटर्स | आयसीडब्ल्यूएआय/आयसीएआय/ सीएजी |
| बँक्स | रिझर्व्ह बँक |
| बँक्स - इश्यू कलेक्शन | सेबी |
| चिट फंड्स | रजिस्ट्रार ऑफ चिट फंड |
| सामुहिक गुंतवणूक योजना | सेबी |
| कंपन्या - सर्व | मिनिस्ट्री ऑफ कार्पोरेट अफेअर्स / रजिस्ट्रार ऑफ कंपनीज |
| कंपन्या - नोंदलेल्या | मिनिस्ट्री ऑफ कार्पोरेट अफेअर्स/ रजिस्ट्रार ऑफ कंपनीज/सेबी/एसई |
| कंपनी सेक्रेटरी | आय.सी.एस.आय. |
| कॉस्ट अकाऊंटंट | आय.सी.डब्ल्यू.ए.आय. |
| सहकारी बँका | रिझर्व्ह बँक |
| पतमानांकन संस्था | सेबी |
| कस्टोडियल सर्व्हिसेस | सेबी |
| डिबेंचर ट्रस्टी | सेबी |
| डिपॉझिटरी | सेबी |

## कोण कोणाचे नियंत्रण करतो ?

| **संस्था** | **नियंत्रक** |
|---|---|
| डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्स | सेबी/एनएसडीएल/सीडीएसएल |
| परदेशी अर्थ संस्था | सेबी |
| गृहवित्त संस्था | एनएचबी |
| विमा कंपन्या, दलाल, प्रतिनिधी | आयआरडीए |
| मर्चंट बँकर | सेबी |
| गुंतवणूकदार संघटना | सेबी |
| प्रसार माध्यमे | एमआयबी |
| म्युच्युअल फंड्स | सेबी |
| म्युच्युअल फंड्स वितरक | सेबी/ॲफी |
| नॉन बँकिंग वित्त संस्था | रिझर्व्ह बँक |
| निधी कंपन्या | एमसीए |
| वृक्ष लागवड कंपन्या | सेबी |
| पोर्टफोलिओ मॅनेजर्स | सेबी |
| रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट | सेबी |
| शेअर दलाल/उपदलाल | सेबी/एसई |
| शेअर बाजार | सेबी |
| व्हेंचर कॅपिटल फंड | सेबी |

## आभार

या पुस्तिकेतील मजकूर मिनिस्ट्री ऑफ कार्पोरेट अफेअर्सच्या www.mca.gov.in, गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधीच्या www.iepf.gov.in, सेबीच्या www.sebi.gov.in, राष्ट्रीय शेअर बाजाराच्या www.nseindia.com, मुंबई शेअर बाजाराच्या www.bseindia.com, एमसीएक्स शेअर बाजाराच्या www.mcx-sx.com, प्राईम डेटाबेसच्या www.primedatabase.com वेबसाईट्सवरून आणि चार्टर्ड अकाऊंटंट्स, कॉस्ट अकाऊंटंट्स, कंपनी सेक्रेटरीजच्या इन्स्टिट्यूट्सने पुरविलेल्या माहितीवर आधारित आहे.

## डिस्क्लेमर

वरील माहिती ही फक्त गुंतवणुकदारांच्या माहितीसाठी आणि त्यांच्यात भांडवल बाजारासंबंधी जागरूकता निर्माण करण्यासाठी दिलेली आहे. ही माहिती देताना जरी योग्य ती काळजी आणि खबरदारी घेतली असली तरी या माहितीवर आधारित केलेल्या कृतीने किंवा घेतलेल्या निर्णयामुळे गुंतवणुकदाराचे नुकसान झाल्यास, मिनिस्ट्री ऑफ कार्पोरेट अफेअर्स किंवा संपादक किंवा ही माहिती वितरित करणाऱ्या संस्था जबाबदार नाहीत. भांडवल बाजाराला लागू असणारे कायदे आणि नियमावली ही सतत बदलत असते त्यामुळे गुंतवणुकदाराने योग्य त्या वेबसाईट्सवरून अथवा नियंत्रक यंत्रणांशी संपर्क साधून आपली माहिती अद्यावत ठेवावी.